**National Association of Street Vendors of India (NASVI)**
**Administrative Office: 6, School Lane, 2nd Floor, Barakhamba Road New Delhi-110001**
**Tel.: 47553013 Mob.: 9967722907, 9835924007**

दिनांक : २९ जानेवारी, २०२५

प्रति,
**मान. श्री. डॉ. महेंद्र कल्याणकर सर (भा. प्र. से.)**
कामगार आयुक्त,
महाराष्ट्र राज्य, मुंबई.

**विषय : आपण नेमूण दिलेल्या अधिकाऱ्यामार्फत नगर पथ विक्रेता समितीच्या निवडणूक प्रक्रियेमध्ये होत असलेल्या दिरंगाईबाबत.**

**संदर्भ : आपण दिनांक २७ मार्च, २०२४ रोजी जिल्हाधिकारी ठाणे यांस दिलेले पत्र क्र. काआ/औसं/प.वि./जिल्हाधिकारी/ठाणे/२०२४/कार्या -९/४५०६**

मान. महोदय,

महाराष्ट्र शासनाच्या आदेशान्वये राज्यामध्ये महानगरपालिकांना नगर पथ विक्रेता समित्यांची निवडणुकीद्वारे स्थापना करण्याबाबत आपणास सूचना देण्यात आलेल्या होत्या. सदर सूचनेनुसार आपण ठाणे महानगरपालिकेमध्ये नगर पथ विक्रेता समितीच्या निवडणुकीसाठी नवी मुंबई महानगरपालिका प्रशासनातील एका अधिकाऱ्याची नेमणूक केली होती. परंतु संबंधित विषयास अनुसरून सदर अधिकाऱ्यामार्फत कोणतीही कार्यवाही केलेली दिसून येत नाही.

नगर पथ विक्रेता समितीच्या निवडणुकीबाबत ठाणे महानगरपालिका प्रशासनातील अधिकाऱ्यांकडे चौकशी केली असता त्यांनी देखील आपण नेमूण दिलेल्या सदर अधिकाऱ्याच्या दिरंगाईचे कारण दिले आहे.

तरी, सदर दिरंगाईमुळे ठाणे महानगरपालिकेमध्ये अद्यापही नगर पथ विक्रेता समितीची निवडणूक प्रक्रिया प्रलंबित असून नगर पथ विक्रेता समितीची स्थापना झालेली नाही. तथापि आपण संबंधीत अधिकाऱ्यास दिरंगाईबाबतचे कारण विचारून सदर निवडणूक प्रक्रिया राबविण्यासाठी तात्काळ दुसऱ्या अधिकाऱ्याची नेमणूक करावी जेणेकरून नगर पथ विक्रेता समितीची स्थापना वेळेत होऊ शकेल अशी आपणाकडे नम्र विनंती आहे.

आपल्या सहकार्याच्या अपेक्षेसह,

आपला नम्र,

गुरुनाथ सावंत
क्षेत्रीय प्रबंधक - महाराष्ट्र राज्य
९९६७७२२९०७